# अहवाल

Reshaping our future with AI and BlockChain या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून *माननीय प्रमोद अत्तरदे*, चेअरमन आणि CEO, APEX DEFI LABS INC, New Jersey, USA यांनी उपस्थित राहून *ब्लॉकचेन व AI* यावर सखोल मार्गदर्शन केले.

त्यांनी *Real Estate, Crypto, Digital Rupee, Train Tickets, Deepfake, Healthcare, Finance, Avatar, Fraud Detection* अशा विविध क्षेत्रांत AI आणि ब्लॉकचेनचा वापर कसा होत आहे याचे सविस्तर विवेचन केले.

विद्यार्थ्यांनी भविष्यातील तंत्रज्ञान समजून घेऊन त्याचा योग्य वापर करावा आणि नव्या संधींचा लाभ घ्यावा, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी भूषवले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी AI चा अभ्यास, संशोधन आणि नोकरीच्या संधींसाठी विद्यार्थ्यांना कसा उपयोग होतो, हे समजावून सांगितले.

कुलगुरू प्रा. संजीव सोनावणे , उपकुलगुरू प्रा. जोगेन्द्रसिंग भिसेन , सर्व विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या उपस्थितीत, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व ब्लॉकचेन विषयक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम YCMOU च्या निरंतर शिक्षण विद्याशाखेच्या वतीने संचालक प्रा. जयदीप निकम यांच्या पुढाकाराने घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागातील प्रा. राम ठाकर, सौ. सोनाली पाटील, श्री. अक्षय विभांडिक, सौ. सुजाता मोरे, श्री. मनोहर पवार, सौ. दिपाली ठाकरे आणि सौ. वर्षा गुजर यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रम प्रेरणादायी, माहितीपूर्ण आणि भविष्याभिमुख ठरला. उपस्थितांनी कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन श्री. मनोहर पवार यांनी केले.



